नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/11/2023 (गुरूवार) सकाळ

## अवैधरीत्या देशी दारुची
## वाहतुक करणाऱ्या आरोपींना अटक
## स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

दिनांक २२/११/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन भिवापूर हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना मुखबिरव्दारे महिती मिळाली की, भिवापूर हद्दीतील भिवापूर नक्षी रोड येथे गाडी क्र. MH 40 CP4336 ने दारूची अवैध वाहतूक होत आहे अशा माहितीवरून गाडी क्र. MH 40 CP4336 ने अवैद्यरित्या दारू वाहतूक करणाऱ्या दोन इसमांना नाकाबंदी केली असता आरोपी नामे– १) सुभाष बालक गजभिये रा. भिवापूर जि. नागपूर २)करण नरेंद्र धनविजय रा भिवापूर यांच्या ताब्यातून विनापरवाना व अवैधरीत्या १) १९२ निपा देशी दारू किंमती १३४४०/–रू. २) गाडी क्र. MH 40 CP4336 किंमती ६०००० असा एकूण ७३४४०/– रुपयाचा मुद्देमाल मिळून् आला. यातील आरोपींना अटक करण्यात आले आहेत. जप्त मुद्देमाल व आरोपी यांना पुढील कायदेशीर कारवाईकरीता पोलीस स्टेशन भिवापूर यांच्या ताब्यात देण्यात आले.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– पोहवा अरविंद भगत स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापूर येथे आरोपींविरुध्द कलम ६५ A, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण) श्री. हर्ष ए. पोद्दार सर (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले साहेब यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.ओमप्रकाश कोकाटे, पोलीस उपनिरीक्षक श्री. आशिष मोरखेडे, पोलीस हवालदार अरविंद भगत, गजेंद्र चौधरी, पोलीस अंमलदार राकेश तालेवार चालक मनीष भुते यांनी पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर